रायगड जिल्ह्यात वितरक व घाऊक विक्रेता नेमणे आहेत.
नामांकित टाटा कंपनीच्या कॉपर वॉटर, फ्रुट, ज्यूसेस, ग्लुकोज ड्रिंक इत्यादी उत्पादना साठी तालुका निहाय वितरक व घाऊक विक्रेता नेमणे आहेत.
-: संपर्क :-
विहा एन्टरप्रायजेस
9004563266
8888570393

दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

दैनिक रायगड नगरी
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Web : www.raigadnagari.com /
Email : raigad.nagari@gmail.com

● वर्ष १७ वे ● अंक १७५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.२५ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावर २७ सप्टेंबरला सुनावणी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाच्या प्रकरणावर सुप्रीम कोर्टात २७ सप्टेंबरला सुनावणी होणार आहे. महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाचं प्रकरण घटनापीठापुढं सुरु आहे. यापूर्वीच्या सुनावणीत २७ सप्टेंबर ही तारीख निश्चित करण्यात आली होती. मंगळवारी दुसऱ्या क्रमांकावर सुनावणी होणार आहे. न्यायमूर्ती चंद्रचूड यांच्या घटनापीठापुढं सुनावणी करण्यात येणार आहे. सुप्रीम कोर्टातील सुनावणीमध्ये निवडणूक आयोगाची कारवाई, १६ आमदारांचं निलंबन, विधानसभा उपाध्यक्षांचे अधिकार यापैकी एका मुद्यावर अग्रक्रमानं सुनावणी सुरु होऊ शकते.**

## ५ न्यायमूर्तींचे घटनापीठ फैसला करणार

सुप्रीम कोर्टात महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावरील सुनावणी न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या घटनापीठापुढं होत आहे. पाच सदस्यीय घटनापीठात न्यायमूर्ती एम. आर.शाह, न्यायमूर्ती कृष्ण मुरारी, न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती नरसिंहा यांच्या घटनापीठापुढं आता २७ सप्टेंबरला सुनावणी होणार आहे.

सुप्रीम कोर्टात ७ सप्टेंबरला महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर सुनावणी झाली होती. घटनापीठापुढं १० मिनिटांची सुनावणी झाली होती. त्या सुनावणीत घटनापीठानं निवडणूक आयोगाला शिवसेनेच्या निवडणूक चिन्हाबाबत कोणताही निर्णय घेऊ नये, असे आदेश दिले होते. शिवसेनेकडून कपिल सिब्बल यांनी घटनापीठापुढं युक्तिवाद केला होता. तर, शिंदे गटाकडून गेल्या सुनावणीत शिवसेनेचं निवडणूक चिन्ह धनुष्यबाण गोठवण्याची मागणी केली होती. त्यावर अभिषेक मनू सिंघवी यांनी आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात अगोदर निर्णय घेण्याची मागणी केली होती.



# बिबट नखे विकणारी टोळी गजाआड

## वनविभाग व माणगांव पोलिसांची कामगिरी

**दै.रायगड नगरी । माणगाव**

**वन्यजीवांची हत्या करून अवयवांची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे. या अवयवांना बाजारपेठेत चांगला मोबदला मिळत असल्याने अनेक टोळ्या वन्यजीवांची हत्या करून तस्करी करीत आहेत. अशीच बिबट नख्यांची विक्री करीत असताना टोळीतील ४ आरोपी व १० बिबट नखे वनविभाग माणगांव व माणगांव पोलिसांनी गजाआड केली आहेत.**



सविस्तरपणे असे की, दि. २१ सप्टेंबर रोजी माणगांव तालुक्यातील निजामपूर विभागातील कुंभार्ते गावच्या हद्दीत पोलीस व वनविभागाच्या संयुक्त कारवाई दरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीनुसार आरोपी मंगेश लक्ष्मण कुर्मे, वय ४५ वर्ष, रा. निजामपूर बोरवाडी रोड व नईम अजीज शेख, वय ३२ वर्ष, रा. निजामपूर बोरवाडी रोड यांना बिबट नखे विकत असताना सापळा रचून रंगेहाथ पकडले. उर्वरित आरोपी दत्ता अनंत पवार, वय २२ वर्ष, रा. बेलवाडी कांदले, रोहा व मंगेश गिरीजा पवार, वय ३५ वर्ष, रा. गारबट वाडी, रोहा याना दि. २२ सप्टेंबर रोजी ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. सदर आरोपीं विरोधात रा.गु.नं. डब्ल्यु.एल.एफ. ०१/ सन २०२२-२३ गुन्हेप्रकरणी पकडुन त्यांचेविरुध्द वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम २, ९, ३९, ४९ व ५१ चे उल्लंघन केल्यामुळे गुन्हा नोंदवून आरोपी यांना मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी माणगांव यांचे कोर्टात हजर केले असता त्यांना दि. २६ सप्टेंबर पर्यंत वन कस्टडी देण्यात आली आहे.

या कामगिरीमध्ये वनपाल निजामपूर संजय चव्हाण, वनरक्षक अशोक कोकडे, जर्मनसिंग पाडावी, अक्षय मोरे, वनपाल ज्ञानदेव सुभेदार, वन क्षेत्र लेखापाल हरेंद्र पालकर, वनरक्षक वैशाली मोरे, चालक विवेक जाधव, सहाय्यक पोलिस उप निरीक्षक सतिश अस्वार, पो. शि. शाम शिंदे, मिलिंद खिरीट, दहिफळे, मिसाळ, पाटील यांची सहकार्य केले असून पुढील तपास उप वनसंरक्षक रोहा विश्वजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी अनिरुद्ध ढगे करीत आहेत.

# उदय सामंत रायगड जिल्ह्याचे नवे पालकमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज राज्यातील पालकमंत्र्यांची नावे जाहीर केली आहेत. उदय सामंत हे रायगड जिल्ह्याचे नवे पालकमंत्री असतील, ह्या आधी महाविकास आघाडी सरकारच्या काळात कु. अदिती तटकरे यांनी पालकमंत्री म्हणून रायगड जिल्ह्याचे काम पहिले, उदय सामंत यांच्याकडे रायगड सह रत्नागिरी जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची सुद्धा जबाबदारी देण्यात आली आहे.**



तर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सहा जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. देवेंद्र फडणवीस हे नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला, भंडारा, गडचिरोली या जिल्ह्याचे पालकमंत्री असतील. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोणतेही पालकमंत्रीपद आपल्याकडे ठेवलं नाही.

जिल्हानिहाय पालकमंत्र्यांची नावे पुढीलप्रमाणे : राधाकृष्ण विखे पाटील- अहमदनगर, सोलापूर, सुधीर मुनगंटीवार- चंद्रपूर, गोंदिया, चंद्रकांत दादा पाटील- पुणे, विजयकुमार गावित- नंदुरबार, गिरीश महाजन- धुळे, लातूर, नांदेड, गुलाबराव पाटील - बुलढाणा, जळगाव, दादा भुसे- नाशिक, संजय राठोड- यवतमाळ, वाशिम, सुरेश खाडे- सांगली, संदिपान भुमरे -औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), उदय सामंत- रत्नागिरी, रायगड, तानाजी सावंत-परभणी, उस्मानाबाद (धाराशिव), रवींद्र चव्हाण- पालघर, सिंधुदुर्ग, अब्दुल सत्तार- हिंगोली, दीपक केसरकर -मुंबई शहर, कोल्हापूर, अतुल सावे - जालना, बीड, शंभूराज देसाई - सातारा, ठाणे, मंगलप्रभात लोढा -मुंबई उपनगर

# दोन वर्षानंतर वनविभागाला आली जाग

## समुद्रकिनारी सुरुची लागवड करण्यासाठी जागेची साफसफाई

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

तब्बल दोन वर्षांनंतर श्रीवर्धन वनविभागाला जाग आली असून समुद्रकिनारी चक्रीवादळात पडलेली सुरुची झाडे नवीन लागवड करण्यासाठी जागेची साफसफाई सुरुवात करण्यात आलेली आहे.

३ जून २०२० रोजी निसर्ग चक्रीवादळ श्रीवर्धन, हरिहरेश्वर किनाऱ्यावरती धडकले. आणि फक्त सव्वा दोन तासांमध्ये वादळाने होत्याचे नव्हते करून टाकले. पंचवीस ते तीस वर्षापूर्वी श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावरती केवड्याची बने खूप मोठ्या प्रमाणावर होती. या केवड्याच्या बना मुळे वादळी वारा आडला जायचा. परंतु काही वेळेला केवड्याची बने तोडून सरपणासाठी देखील वापरण्यात येत होती. तसेच प्रत्येक वेळी गणेशोत्सव आला की केवड्याची बने तोडून गणपतीला वाहण्यासाठी केवड्याच्या सुवासिक कळ्या काढण्याचा घाट नागरिकांकडून घातला जातो. त्यामुळे केवड्याची बने पूर्णपणे नष्ट झाली. त्यानंतर २००१ साली श्रीवर्धन नगर परिषदेने पुढाकार घेऊन वनविभागाच्या सहकार्याने श्रीवर्धन समुद्रकिनारी खूप मोठ्या प्रमाणात सुरूच्या झाडांची लागवड केली होती.

.../२



# करळच्या चांदनी चौकात एनएमएमटी बसला अपघात



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण वरून नवी मुंबई कडे जाणाऱ्या एनएमएमटीचा करळच्या चांदनी चौकाजवळ अपघात झाला. सुदैवाने या अपघातात कोणालाही इजा झाली नसली तरी एनएमएमटीच्या बस बद्दल आणि ती बस चालवणाऱ्या चालकाच्या गुणवत्ते बद्दल शंका व्यक्त करण्यात येत आहे. दोन दिवस अगोदर देखिल करळ उड्डाण पुलावर कार आणि एनएमएमटीचा अपघात झाला होता.

एनएमएमटीची गाडी नवी मुंबईकडे जात होती. ही गाडी चांदनी चौकातून करळ कडे वळवत असताना या गाडीचे स्टेअरींग लॉक

.../२

# जमिनी बिल्डरांच्या हाती न देता तुमच्या गावाचा विकास तुम्हीच करा : चंद्रशेखर प्रभू

**दै.रायगड नगरी । उरण**

बिल्डरांच्या हाती जमिनी न देता तुमचा विकास तुम्हीचं करा असे मत मात्र जेष्ठ नगररचनाकार चंद्रशेखर प्रभू यांनी जेएनपीटी कामगार वसाहत येथील बहुउद्देशिय सभागृहात आयोजित गावठाण हक्क परिषदेत बोलतांना व्यक्त केले.

तुमच्या पुढील शंभर वर्षांनंतर काय होणार याचा विचार वास्तुविशारद करतात मात्र नेत्यांना ५० वर्षात काय होईल याची जाण नसते त्यामुळेच सिडकोने विकासाच्या नांवाने नवी मुंबईतील शेतकऱ्यांच्या जमिनी घेऊन त्यांना नेस्तनाबूत केले असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ वास्तुविशारद चंद्रशेखर प्रभू यांनी शनिवारी उरण मध्ये आयोजित गावठाण हक्क परिषदेत बोलतांना केले.

जेएनपीटी कामगार वसाहतीच्या बुद्देशीय सभागृहात या परिषदेचे गावठाण हक्क परिषदेने आयोजन केले होते. परिषदेच्या अध्यक्षस्थानी जेएनपीटीचे कामगार नेते कॉम्रेड भूषण पाटील हे होते. तर परिषदेत शासनाने २५ फेब्रुवारी २०२२ ला काढलेल्या प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्याच्या आदेशात बदल करावा. यामध्ये प्रकल्पग्रस्तांच्या घराखालील जमिनी शासनाने प्रकल्पग्रस्तांच्या कायमस्वरूपी मालकी हक्काने नावी



करण्याची मागणी करणारा ठराव निमंत्रक रामचंद्र म्हात्रे यांनी मांडला. या ठरावाला सर्व उपस्थितांनी पाठींबा दिला.

यावेळी सुधाकर पाटील, जनार्दन भोईर,मधुसूदन म्हात्रे,संतोष पवार,मुकुंद पाटील,धन्वंती ठाकूर व डी. आर.घरत आदींनी आपल्या सूचना मांडल्या. त्याचप्रमाणे संजय ठाकूर यांनी प्रास्ताविक केले.यावेळी पुढे बोलतांना प्रभू यांनी विकासाला दूरदृष्टी हवी मात्र पुढारी फक्त पाच वर्षांचा विचार करतात.१९७० नंतर काय होईल याची क्षमता शेतकऱ्यां मध्ये

.../२

# खोके सरकारच्या अपयशामुळे फॉक्सकॉन गुजरातला : आदित्य ठाकरे



**दै.रायगड नगरी । पुणे**

रोजगारासाठी तरुणांना लाठी खावी लागते हे दुर्दैव आहे. राज्यातील सध्याचे सरकार नसून ती एक सर्कस आहे. सध्या राज्यातील तरुणांचा रोजगार जातोय. मविआ सरकार असते तर वेदांता फॉक्सकॉन प्रकल्प महाराष्ट्रात आणलाच असता, असं वक्तव्य शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी तळेगावात केलं. चाळीस आमदारांसोबत मीही राजीनामा देतो, सर्वांनी निवडणुकीला सामोरे जाऊ, असं आव्हानही शिंदे गटातील आमदारांना आदित्य ठाकरेंनी दिले.

आज पुणे जिल्ह्यातील तळेगाव येथे शिवसेनेने आंदोलन केले. आदित्य ठाकरेंच्या नेतृत्वात येथे जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला गेल्याने शिवसेना आक्रमक झाली आहे. यावेळी हजारो शिवसैनिक एकत्र येत त्यांनी राज्य सरकारचा निषेध केला.

यावेळी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, आम्ही, केंद्राला किंवा गुजरातला दोष देत नाही, हा दोष खोके सरकारचा आहे. महाराष्ट्रातल्या राजकीय अस्थिरतेचा फायदा गुजरातने घेतला. सध्या राज्याचे खरे मुख्यमंत्री कोण हेच कळत नाही.

माझ्या गटात कोण येतंय त्यापेक्षा महाराष्ट्रात रोजगार कोण आणतंय ते पाहा. आमच्यावर चाळीस वार केलेत पण राज्यातल्या जनतेवर वार करू नका. शिंदे सरकार हे सरकार नसून ती एक सर्कस आहे, असा टोलाही आदित्य ठाकरेंनी यावेळी बोलताना लगावला.

# चिरनेरच्या शौर्यभूमीतील २५ सप्टेंबर १९३० चा जंगल सत्याग्रह



भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात जे जे उठाव झाले त्यात चिरनेरचा जंगल सत्याग्रहाचा आवर्जून समावेश करावा लागेल. ब्रिटिशांच्या विरोधात ज्या शूरवीरांनी आपल्या प्राणाची आहुती देऊन हौतात्म्य पत्करले त्यात चिरनेर जंगल सत्याग्रहातील शूरवीर धाकू गवत्या फोफेरकर,नाग्या महादू कातकरी दोघेही – चिरनेर,आलू बेंमट्या म्हात्रे – दिघोडे,आंनदा माया पाटील – धाकटीजुई,रामा बामा कोळी – मोठीजुई, रघुनाथ मोरेश्वर शिंदे(न्हावी)– कोप्रोली, हसुराम बुधाजी घरत – खोपटे व परशुराम रामा पाटील – पाणदिवे या हुतात्म्यांचा प्रामुख्याने सहभाग होता. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाचे बलिदान देणाऱ्या या विरांना ही मातृभूमी कधीच विसरणार नाही. येथील हुतात्म्यांच्या नावाने उभारण्यात आलेली स्मारके आज ही प्रेरणादायी ठरलीआहेत.१९३० च्या कायदेभंग चळवळीत २५ सप्टेंबरच्या सत्याग्रहातील गोळीबार प्रकरणामुळे चिरनेर गावाचे नाव साऱ्या महाराष्ट्र राज्यासह हिंदुस्तानात गाजत आहे. चिरनेर जंगल सत्याग्रहाचा हा लढा भारत देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा इतिहास आहे.

महात्मा गांधींच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा एक भाग म्हणून चिरनेर येथे जंगल सत्याग्रह करण्यात आला. जंगल सत्याग्रह या ना–वातूनच सत्याग्रहाचा हेतू स्पष्ट होतो. हा सत्याग्रह अनेक कारणामुळे वैशिष्ट्यपूर्ण मानावा लागेल. या सत्याग्रहाला सामान्य जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. या उरणच्या खेड्यापाड्यातील सामान्य जनता ब्रिटिश सत्तेविरोधात एवढ्या एकजुटीने उभी ठाकली होती की, ब्रिटिश सरकारच्या अधिकाऱ्यांना दहशतकारी मार्गाचा अवलंब करण्याची वेळ आली.मात्र सत्याग्रहींनी अहिंसात्मक असे धोरण स्विकारले आणि ब्रिटिश राजवटीचे सारे अत्याचार सहन केले. या सत्याग्रहाचे नेतृत्व भाईसाहेब गुप्ते यांच्याकडे होते व हा सत्याग्रह दडपणाचे प्रयत्न तत्कालीन ब्रिटिश सरकारने चालविले होते. मात्र पोलिसांची दडपशाही झुगारून हजारो लोक सकाळपासूनच चिरनेरच्या आक्कादेवीच्या माळरानावर एकत्र आले होते. इन्स्पेक्टर रामचंद्र दौलत पाटील हे देखील हत्यारी पोलिसांच्या तुकडीसह घटनास्थळी दाखल झाले. मात्र या गोष्टीचा अंदाज घेऊन मामलेदार केशव जोशीही चिरनेर येथे जातीने हजर होते. यावेळी हजारो सत्याग्रहांची मिरवणूक शांततेने निघाली होती.

यात उरण तालुक्यातील चिरनेर कळंबुसरे ,कोप्रोली, मोठी जुई, धाकटीजुई , दिघोडे ,खोपटे, सारडे ,पांणदिवे,पिरकोन, पाले, आवरे,गोवठणे या गावातून हजारोंच्या संख्येने शेतकरी तरुण सहभागी झाले होते.सत्याग्रहाच्या प्रेरणेने भारा–वून गेलेल्या तरुणात काही उमदे तरुण नुकतेच लग्न झालेले हे तरुण भारत मातेच्या मुक्तीसाठी पेटून उठले होते. यावेळी बऱ्याचशा सत्याग्रहींच्या हातात कोयते ,कुर्हाडी व काठ्या होत्या. त्यांनी जंगलातील झाडे तोडून कायदेभंग करण्यास प्रारंभ केला आणि जंगल का कायदा तोड दिया अशा घोषणांनी सारे जंगल दणानूण गेले होते. जंगलातील झाडे तोडणाऱ्यांना पोलिस अटक करण्यासाठी घेऊन जात होते. मात्र मामलेदार केशव जोशी यांनी सत्याग्रहींच्या हातातील बेड्या काढण्यास पोलिस फौजदाराला आदेश दिले परंतु पोलिस इन्स्पेक्टर रामचंद्र पाटील यांनी मामलेदारांचे आदेश धुडकावून लावून सत्याग्रहींना अमानुष मारझोड सुरू केली. ऑर्डर ऑफ फायरची आज्ञा द्या ,असे फौजदार रामचंद्र पाटील हे मामलेदार केशव जोशी यांना वारंवार सांगत होते. परंतु मामलेदार केशव जोशी यांनी सक्त ताकीद दिली होती की कुणीही गोळीबार करावयाचा नाही. असे सांगून सुद्धा मातीशी बेइमानी करणाऱ्या या पोलिस इन्स्पेक्टरने ब्रिटिशांचा तुकडा खाल्ला होता.

त्यामुळे गोळीबारास विरोध करणाऱ्या मामलेदार केशव जोशी यांचा त्यांनी पहिला बळी घेतला आणि मोठ्याने फायर, फायर असे ओरडून गोळीबार सुरू केला. बेछुट गोळीबारात जागीच बारा हुतात्मे झाले अत्यंत शांततेने चाललेल्या या सत्याग्रहाला हेकट व खूनशी स्वभावाच्या पोलिस अधिकाऱ्यांमुळे गालबोट लागले. पोलिसांच्या गोळीबारात सात सत्याग्रहींना व काही महिन्यानंतर पोलीस गोळीबारात जखमी झालेल्या नाग्या महादू कातकरी यालाही आपले प्राण गमवावे लागले या सत्याग्रहाच्या स्वातंत्र्य लढ्यात आठ शूरवीर देशभक्तांनी आपल्या प्राणाची आहुती दिली.तर मामलेदारासह पाच सरकारी कर्मचाऱ्यांना यावेळी आपले प्राण गमवावे लागले. दरम्यान बहुजन समाजाचे पुढारी व आमदार नारायण नागु पाटील यांना या घटनेची माहिती मिळताच ते चिरनेर येथे आले आणि कोठडी वजा देवळासमोर गेले आतील दृश्य पाहून त्यांचा संताप आनावर झाला. आम्हाला देवदर्शन घ्यायचे आहे. त्यासाठी दरवाजा उघडा, असे पहारेकरी शिपायाला सांगितले.

पण त्या शिपायाने साहेबांची परवानगी आणावी लागेल ,असे सांगताच आमदारांच्या अंगाचा तिळ पापड झाला आणि ते कडाडले आम्ही आमदार आहोत. जा तुझ्या साहेबाला सांग आणि लगेच त्यांनी दरवाजाला धडक दिली आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सत्याग्रहींना केलेल्या अमानुष मारहाणीबद्दल जाब विचारला. इतकेच नव्हे तर आमदार नाना पाटील यांनी कॅन्सिलमध्ये या अमानुषतेला वाचा फोडली. या सत्याग्रहात सहभागी झालेल्या ४७ जणांवर सरकारने खटले दाखल केले होते.

यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चिरनेर आरोपींच्या खटल्यातील काम पाहिले होते. या स्वातंत्र्य लढ्यात पनवेलच्या गुप्ते घराण्याचे योगदान मोलाचे असून, चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांची स्मृती जागवण्यासाठी एकेकाळचे क्रांतिकारी देशभक्त सेनापती बापट यांच्या अध्यक्षतेखाली पहिला हुतात्मा स्मृतिदिन चिरनेर येथील याच आक्कादेवीच्या माळरानावर साजरा करण्यात आला होता. यावेळी मातीच्या स्मारकाला सर्वांनी दिलेली ही पहिली मानवंदना होय. या घटनेला आज २५ सप्टेंबर २०२२ रोजी ९२ वर्ष पूर्ण होत आहेत.

या स्मृतिदिनाच्या समारंभाला आ. नाना पाटील, भाईसाहेब गुप्ते, नानासाहेब बेडेकर ,डॉक्टर खैरे, नाना कुंटे, विनायकराव गोविलकर, स्वयंसेवक व देशसेवकांची पथके तसेच चिरनेर व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते. ब्रिटिश राजवटीत संपन्न झालेला हा २५ सप्टेंबर १९३० सालचा पहिला हुतात्मा स्मृतिदिन गणला जात आहे. दरम्यान चिरनेर गावात गणपतीच्या देवळाजवळ आज अस्तित्वात असलेले हे (दगडी स्मारक) हुतात्मा स्मृतीस्तंभ सर्वांनाच प्रेरणा देणारे ठरले आहे. गेली कित्येक वर्ष २५ सप्टेंबरच्या दिवशी या हुतात्मा स्मारकाला शासकीय मानवंदना दिली जाते. हे स्मारक म्हणजे वास्तुशास्त्राचा एक उत्कृष्ट नमुना आहे. हा स्मृतिस्तंभ दंडगोलाकार आहे त्याच्या कळसावर ज्योत दिसून येते. चारी बाजूला वंदे मातरम् च्या पाट्यांमध्ये प्रत्येकी तीन नावे असून त्यांची संख्या १२ आहे. मामलेदारांसह सरकारी पाच लोक आणि जनतेपैकी सात जणांची नावे होती. शासनाच्या वतीने वंदे मातरम् ची एक पाटी कमी करून आदिवासी हुतात्मा नाग्या कातकरी यांचेही नाव २३ जानेवारी २००२ रोजी स्तंभावर आले आहे.

त्यामुळे स्मृतिस्तंबावरील नावांची संख्या आता १३ दिसून येत आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत अनेक ठिकाणी हुतात्मा स्मारके उभारली आहेत त्यापैकी चिर–नेर येथे साधारण एक चौरस फुटाच्या क्षेत्रावर हे स्मारक उभारले गेले आहे. या स्मारकाच्या दर्शनी भागात २५ फूट उंचीचा स्तंभ बांधला गेला आहे. या स्तंभाच्या टोकावर स्मारकाचे बोधचिन्ह म्हणून स्मशाल दिसून येते स्मारकांमध्ये असलेले सभागृह हे स्मारकाचे आकर्षण आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाचे बलिदान देणाऱ्या या वीरांना ही मातृभूमी कधीच विसरणार नाही. येथील हुतात्म्यांच्या नावाने उभारण्यात आलेली स्मारके आजही प्रेरणादायी असून देशभक्तीची प्रेरणा देत आहेत. राष्ट्रहितास्तव आणि समाज रक्षणास्तव ज्यांनी आपले आयुष्य वेचले. त्या जंगल सत्याग्रहात हाती तिरंगा घेऊन प्राणाचे बलिदान देऊन ज्यांनी धाडसाने जनजागृती केली. त्या शूरवीर ठरलेल्या देशभक्तांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन !!!

# नवरात्रोत्सव मंडळांना लागले नवरात्र उत्सवाचे वेध

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

कोरोनामुळे जैविक महामारीने संपुर्ण जग कवेत घेतले होते. नवरात्रौत्सवावर शासकीय निर्बंध होते. सर्वत्र नैराश्य व बंधनमुक्त वातावरणात सर्वांचा जीव गुदमरला होता. मात्र यावर्षी सण व उत्सव साजरे करण्यास मोकळीक मिळाली आहे. निर्बंधच रद्द करण्यात आल्याने मंडळांना नवरात्रौत्सवाचे वेध लागले आहेत.

मंडळांकडून जय्यत तयारी सुरू आहे. दोन वर्षानंतर गरबा घुमणार असल्याने तरुणाईंमध्ये उत्साह निर्माण झाला आहे . कोरोनामुळे आलेला निरूत्साह झटकून भाविकांमध्ये चैतन्य निर्माण झाले आहे. विशेषतः तरुणाईचे आकर्षण असलेला हा उत्सव त्यांना उत्साहात साजरा करता येणार आहे. गरबा, दांडियासाठी परवानगी दिली असल्याने विविध मंडळे, राजकीय पक्षांकडून दांडिया नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. राजकीय पक्षांमध्ये चुरस निर्माण झाल्याने बक्षिसांच्या रकमेत चढाओढ सुरू झाली आहे. पाली सुधागड सह जिल्ह्यातील सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळाची तयारी सुरू झाली आहे. मंडळांना नवरात्रौत्सवाचे वेध लागले आहेत. मंडप उभारण्याचे काम सुरू झाले आहे. मूर्तीकारही देवीच्या वेगवेगळ्या आकाराच्या सुबक व रेखीव मूर्ती घडविण्याच्या कामात व्यस्त आहेत. अवघे आठ दिवस शिल्लक राहिल्याने भाविकांचाही उत्साह वाढला आहे. पाली सुधागडातील बाजारपेठा नवरात्र उत्सवासाठी लागणाऱ्या साहित्याने गजबजल्या आहेत. पावसाने उघडीक केल्याने लोक खरेदीसाठी बाहेर पडत आहेत. दि. २६ सप्टेंबर २०२२ पासून सुरू होणाऱ्या नवरात्रोत्सवाची पालीतील श्री अंबिका माता मंदिरात जय्यत तयारी सुरू झालीय. अध्यक्ष विक्रम परमार यांच्या मार्गदर्शनाखाली आरती, प्रसाद, व विविध विधायक व मनोरंजनाचे कार्यक्रम घेतले जाणार आहेत. भोजनाची देखील व्यवस्था केली जाणार आहे. तसेच सुधागड किल्ल्यावरील श्री भोराई देवीचा नवरात्रोत्सव यंदा उत्साहात व विविध धार्मिक उपक्रम राबवून मोठ्या प्रमाणात साजरा होणार आहे.

दांडिया स्पर्धेतील बक्षिसे मिळविण्यासाठी दांडिया ग्रुपची तयारी सुरू आहे. दांडियासाठी फॅन्सी दांडिया, विशेष कपडे, त्यावर सुसंगत ज्वेलरी बाजारात विक्रीसाठी आल्या आहेत. दांडिया स्पर्धेसाठी खास ऑर्केस्ट्रा, गायक, वाद्यवृंदासाठी आधीच बुकींग सुरू आहे. पावसामुळे उत्सवावर विघ्न येऊ नये यासाठी वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात येत आहेत. एकूणच यंदाच्या नवरात्रोत्सवात प्रचंड उत्साह, जोश, जल्लोष असा धूम मचवणार असल्याचे चित्र स्पष्ट झालेय.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## दोन वर्षानंतर वनविभागाला आली जाग

सुरुची झाडे जवळजवळ वीस वर्षाची झाली होती. त्यामुळे त्या ठिकाणी सतत सावली असायची, येणाऱ्या पर्यटकांना बसण्यासाठी जागा तयार व्हायची. परंतु निसर्ग चक्रीवादळात जवळजवळ पाच हजारापेक्षा जास्त सुरुची झाडे पडून गेल्याने संपूर्ण श्रीवर्धन समुद्र किनारा उघडा पडला होता.

२०२० साली आलेल्या निसर्ग चक्रीवादळा नंतर २०२१ झाली तोक्ते चक्रीवादळ पुन्हा एकदा या ठिकाणी झाले. परंतु हे वादळ अरबी समुद्रातुन गुजरातच्या दिशेला सरकल्या मुळे हानी कमी झाली. समुद्रकिनारी सुरुची लागवड पुन्हा करावी याबाबत अनेक वेळा चर्चा देखील झाल्या. परंतु दोन वर्षानंतर आता वन विभागाला जाग आली असून वन विभागाने सुरुची लागवड करण्यासाठी त्या ठिकाणच्या जागेची साफसफाई सुरू केल्याचे पाहायला मिळत आहे. या वर्षी जरी सुरुची लागवड केली तरी झाडे मोठी होण्यासाठी आठ ते दहा वर्षांचा कालावधी लागतो. झाडांचे संगोपन करण्यासाठी वनविभागाने झाडे लावल्यानंतर संपूर्ण परिसराला तारेचे कुंपण करणे आवश्यक आहे. नाहीतर श्रीवर्धन समुद्रकिनारी फिरणारे मोकाट घोडे, गुरे यांच्याकडून केलेल्या लागवडीला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## करळच्या चांदनी चौकात एनएमएमटी बसला अपघात

झाले आणि ही गाडी सरळ सिमेंटचा कठडा तोडून दुसऱ्या मार्गावरून जाणाऱ्या कंटेनर ट्रेलरला धडकली. सुदैवाने या गाडीची टक्कर ट्रेलरला झाली जर ट्रेलरची टक्कर बसला लागली असती तर मोठी दुर्घटना झाली असती. या बसमध्ये जवळ जवळ २५ ते ३०प्रवाशी प्रवास करत होते. या अपघातानंतर एनएमएमटी च्या गाड्यांच्या गुणवत्ते बद्दल शंका व्यक्त करण्यात येत आहे. नवीन करळ पुलावर बांधलेल्या सिमेंटच्या कठड्यांच्या कामा बद्दल देखिल प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

## जमिनी बिल्डरांच्या हाती न देता तुमच्या गावाचा विकास तुम्हीच करा

नव्हती. परंतु दि. बा. पाटील यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या किंमतीची जाणीव करुन देत जमिनी विकू नका हे सोन आहेत. त्या राखा हे पटवून सांगण्याचा प्रयत्न केला.

त्यामुळे उरण मध्ये येणारा पारबंदर(शिवडी–न्हावा) मार्ग हा येथील जमिनींनीना सोन्यापेक्षा ही अधिकची किंमत देईल. परंतु शेतकऱ्यांनी जमिनी विकून पुढील पिढीवर अन्याय केला आहे. साडेबारा टक्केच्या कायद्यात भूखंडाची विक्री करता येणार नाही ही अट आपणच टाकली असल्याची माहिती त्यांनी दिली. त्यामुळे भविष्याचा विचार करून तुमचा विकास तुम्हीच करा त्यासाठी घराखालील जमिनीनी भाडेपट्टी वर नाही तर मालकी हक्काने मिळाल्या पाहिजेत.

त्यासाठी एक व्हा कारण शासनाने भाडेपट्टी(लीज)वरील जमिनी मालकी हक्काने देण्याचा कायदा २०२० ला केला आहे. त्यामुळे नवा समाज घडविण्यासाठी प्रकल्पग्रस्तांनी स्वतःच्या विकासाची जबाबदारी स्वतः घ्यावी त्यासाठी लागणारी सर्व तांत्रिक मदत करण्याचेही आश्वासन प्रभू यांनी या परिषदेत बोलतांना दिले.या परिषदेला,उरण,पनवेल व नवी मुंबईतील विविध गावातील सिडको प्रकल्पग्रस्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीय जनता पक्षाच्या वतीने तळा तालुक्यातील रहाटाड येथे स्वच्छता अभियान

**दै.रायगड नगरी । तळा**



देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी व महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री रविंद्रजी चव्हाण साहेब यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने भारतीय जनता पक्षाच्या वतीने तळा तालुक्यात १७ सप्टेंबर ते २ पर्यंतसेवा पंधरवडा साजरा करण्यात येत असुन त्याचाच एक भाग म्हणून दि.२४/९/२०२२ रोजी रहाटाड येथे सकाळी ९ वाजता स्वच्छता अभियान राबविण्यात आले रहाटाड बस स्थानक व गावातील परीसर स्वच्छ करण्यात आले.

२५/ ९ / २२ रोजी मन की बात प्रत्येक शक्ति केंद्राच्या ठिकाणी होणार आहे १६/९ /२२एक भारत विविधता मे एकता पिटसई हायस्कूल सकाळी११वाजता २७/ ९ /२२ आरोग्य तपासणी द्वारकामाई बंगलासिद्धिविनायक मंदिर तळा ९ .३०ते २ .३० पर्यंत १/१०/२२ अमृतसरोवर ज्ञानेश्वर मंदिर ते रामेश्वर मंदिर तलाव साफ सफाई स्वच्छता २/१०/२२ वृक्षारोपण तळगड किल्ला परिसर व तळा मांदाड रोड सकाळी १०.३० वाजता अशा विविध कार्यक्रमाने आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी व सार्वजनिक बांधकाम मंत्रीअन्नपुरवठा मंत्री मा. रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसा निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या पंधरवड्या सह तळागाळापर्यंत सेवा सुविधा पोहचल्या जाणार असून लाभ दिला जाईल असे महाराष्ट्र प्रदेश सचीव रवीभाऊ मुंढे व तालुका अध्यक्ष ॲड निलेश रातवडकर यांनी सांगितले.

यावेळी सरचिटणीस खेळु वाजे, शहर अध्यक्ष लहु चव्हाण, नगरसेवक तथा युवा मोर्चा जिल्हासरचिटणीस रितेश रवि मुंढे, रहाटाड बुथ अध्यक्ष मंगेश कंबु, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष वैभव कदम, सोशल मिडीया संयोजक केज्योतदिप मुंढे, युवा मोर्चा शहर अध्यक्ष कु.सुयोग बारटक्के,युवा मोर्चा तालुका सचिव सागर वरंडे, निलेश तळेकर, सोहम मुंढे, सरपंच चांगदेव रामा पाटिल,उपसरपंच अशोक खंडागळे, गाव अध्यक्ष देवजी बोडेरे, बाबु लासे, नथुराम वरंडे, नामदेव करंजे, अंकुश दर्गे, प्रकाश चव्हाण, भगवान गोठेकर, अंकुष दर्गे, रामचंद्र पिसे, जाया देवे, खेळुराम पाटील, माया मुकाटे व सर्व पदाधिकारी, ग्रामस्थ व महिला मंडळ उपस्थित होते.

# संभाजी ब्रिगेडच्या वतीने किल्ले रायगडावर दुसऱ्या शिवराज्याभिषेक सोहळा दिमाखात साजरा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

संभाजी ब्रिगेडच्या वतीने आज किल्ले रायगडावर दुसऱ्या शिवराज्याभिषेक सोहोळ्याचे दि.(२४) सप्टेंबर रोजी शानदार आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या सोहोळ्याला संभाजी ब्रिगेडच्या केंद्रीय आणि विभागीय कार्यकारिणीचे सदस्य उपस्थित होते. या निमित्ताने सकाळी सव्वादहा वाजता राजसदर–`वर जिजाऊ शिवराय प्रतिमेचे संभाजी ब्रिगेडतर्फे आयोजन पूजन, साडेदहा वाजता राज्याभिषेक समारंभ , १०.४५ वा . जिजाऊ वंदना अशा विविध कार्यक्रमाचे पार पडले. दुपारी १२ वा . मान्यवरांनी आपले ऐतिहासिक विचार मांडले. या सोहोळ्यात गिर्यारोहक समृध्दी भुतकर हिला हिरकणी पुरस्कार देऊन तसेच शाहीर, कवी गंगाधर साळवी, डॉ. वारिस अन्सारी, नरवीर ॲडव्हेंचर्सचे रामदास कळंबे, अजय पाटील, दिवंगत सर्जेराव झांजुर्णे, श्रीमंत सर्जे राव झांजुर्णे तसेच सौ. मोनाली निलेश झांजुर्णे यांना विशेष सन्मानार्थी म्हणून सन्मानित करण्यात आला.



# नवरात्रोत्सव शांततेत व उत्साहात साजरा करा : देविदास मुपडे

**दै.रायगड नगरी । रेवदंडा**

रेवदंडा पोलीस ठाणेच्या वतीने दि.२२.०९.२०२२ ऑगस्ट रोजी शांतता कमिटी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत आगामी साजऱ्या होणाऱ्या नवरात्रौत्सव शांततेत पार पडण्यात यावेत. या करिता रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीतील शांतता कमिटी, मोहल्ला कमिटी, ग्राम रक्षक दल, सागर रक्षक दल, पोलीस पाटील, पत्रकार बंधू, समाज अध्यक्ष, तंटामुक्ती कमिटी अध्यक्ष व प्रतिष्ठित नागरिक तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे सदस्य यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी रेवदंडा पोलीस ठाणेच्या हद्दीतील सर्व नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दाखवली. तर रेवदंडा पोलीस निरीक्षक देविदास मुपदे यांनी सण साजरे करण्यासाठीचे नियमंची नियमावली वाचून दाखवली.

नवरात्रोत्सव शांततेत आणि उत्साहात साजरा करा, असे आवाहन रेवदंडा पोलीस यंत्रणेच्यावतीने नागरिक आणि सार्वजनिक उत्सव मंडळांना करण्यात आले आहे. या संदर्भात चर्चा करण्यासाठी रेवदंडा पोलीस ठाणे सभागृह येथे अत्यंत महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, डी.वाई.एस.पी काकडे यांनी मार्गदर्शन केले. रेवदंडा पोलीस स्थानकाच्या हद्दीतील नवरात्रोत्सव मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि शांतता कमिटीचे प्रतिनिधी या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक देविदास मूपडे यांनी महत्त्वपूर्ण अशा सूचना केल्या. ते म्हणाले की नवरात्रौत्सव ठिकाणी जातीय/धार्मिक भावना भडकून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असे आक्षेपार्ह बॅनर,पोस्टर्स, नसावे नवरात्रौत्सव मंडळ परिसरात सुरक्षेच्या दृष्टीकोनातून नियंत्रण ठेवण्यासाठी सी.सी.टी.व्ही.कॅमेरे लावण्यात यावेत. गरबासाठी येणाऱ्या महिलांची छेडछाड होवू नये. नवरात्रौत्सव साजरा करीत असलेल्या ठिकाणी आपत्कालीन परिस्थितीमध्ये उपयोगात आणण्यासाठी जनरेटर, इत्यादी अत्यावश्यक साधनसामग्री ठेवण्यात यावी,असे निर्देशही त्यांनी मंडळांना दिले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## स्मार्ट आयसीयू सर्टिफिकेशन मिळवणारे

# कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल हे नवी मुंबईतील पहिले रुग्णालय

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबई हे थ्रीएम इंडिया कडून महामारीनंतर स्मार्ट आयसीयू सर्टिफिकेशन देण्यात आलेले पहिले रुग्णालय ठरले आहे. हे सर्टिफिकेशन मिळवणारे हे नवी मुंबईतील पहिलेच रुग्णालय आहे. कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबईतील क्रिटिकल केयरचे डायरेक्टर डॉ. भरत जिगयासी यांच्या नेतृत्वाखाली ३० पेक्षा जास्त हेल्थकेयर कर्मचाऱ्यांनी मिळून यशस्वीपणे पूर्ण केलेल्या सहा महिने चाललेल्या प्रकल्पानंतर हे सर्टिफिकेशन देण्यात आले आहे. या आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांकडून आयसीयूमध्ये अंमलात आणल्या जाणाऱ्या सर्वोत्तम प्रथांना प्रोत्साहन देऊन आणि ज्ञान, माहितीमध्ये सुधारणा घडवून आणून आरोग्यसेवेतून मिळणाऱ्या परिणामांमध्ये सुधारणा घडवून आणण्यावर या प्रकल्पाचा भर होता.**

रुग्णांची सुरक्षितता व काळजी या संदर्भात मिळणारे लाभ हा या प्रकल्पाचा एक मोठा परिणाम असून सर्टिफिकेशनमध्ये त्याची दखल घेतली जाते. केडीएएच, नवी मुंबईसारख्या स्मार्ट आयसीयूमध्ये ज्यांचे पालन केले जाते त्या गुणवत्ता निर्देशांकांमुळे आयसीयू रुग्णांमध्ये ज्यामुळे सेकंडरी संसर्ग टाळता येतो अशा अनुपालनांचे कठोर पालन केले जाते. जेव्हा रुग्ण क्रिटिकल केयरमध्ये असतो तेव्हा त्याची रोगप्रतिकार क्षमता आधीच कमी झा–लेली असते त्यामुळे इतर संसर्ग होण्याची शक्यता वाढलेली असते. रुग्णांच्या बाबतीत अशा समस्या उत्पन्न होण्यापासून बचाव करण्यासाठी स्मार्ट आयसीयूमध्ये सुरक्षा उपायांना पुनःपरिभाषित केले जाते. या उपायांची अंमलबजावणी केली जात असल्याने रुग्णांची तब्येत जलद गतीने बरी होते



व रुग्णालयात जास्त दिवस राहावे लागणे टाळले जाते. रुग्णांची सुरक्षितता व काळजी या संदर्भात कर्मचाऱ्यांच्या कौशल्यांमध्ये वाढ घडवून आणल्याने रुग्णांना अतिरिक्त खर्च करावा लागण्याच्या घटना कमी झाल्या आहेत. स्मार्ट आयसीयू असणे महत्त्वाचे असल्याच्या मुद्द्यावर भर देत केडीएएच, नवी मुंबईचे क्रिटिकल केयरचे डायरेक्टर डॉ. भरत जिगयासी म्हणाले, याठिकाणी केडीएएच नवी मुंबईमधील आमची टीम आणि या प्रकल्पादरम्यान त्यांनी अतिशय निष्ठेने व धैर्याने केलेले काम याचा आम्हाला अतिशय अभिमान वाटतो. कोविड–१९ सुरु झाल्यापासून क्रिटिकल केयर आणि संसर्गापासून बचाव व त्यावरील नियंत्रण यांचे महत्त्व अधिक जास्त प्रकाशझोतात आले आहे. दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात इंटरनॅशनल इन्फेक्शन प्रिव्हेन्शन वीक पाळला जातो, यासारख्या प्रकल्पांमधून मानक मार्गदर्शक सूचनांच्या आधारे बारकाईने लक्ष ठेवण्याची आणि प्रशिक्षणामार्फत सुधारणेची प्रक्रिया सुरु राहील. जागतिक निकषांच्या आधारे कौशल्य वृद्धी व आमच्या गुणवत्ता व्यवस्थांमध्ये सुधारणा घडवून आणणे आम्ही सुरु ठेवू. या संपूर्ण प्रक्रियेचे नेतृत्व डॉ पूनम गिरी, प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर आणि मॉडरेटर, डॉ. अमृता एस, चीफ नर्सिंग ऑफिसर आणि श्रीमती रेखा पाटील, नर्स एज्युकेटर यांच्या कोर टीमने केले. सर्टिफिकेशनसाठीची मापदंड मार्गदर्शक तत्त्वे जागतिक आरोग्य संघटना, सोसायटी फॉर हेल्थकेअर एपिडेमियोलॉजी ऑफ अमेरिका आणि नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर क्लिनिकल एक्सलन्स यांसारख्या आरोग्य सेवा संस्थांनी आखून दिलेल्या आंतरराष्ट्रीय मानकांवर आधारित आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केल्याने हे सुनिश्चित होते की आयसीयू रुग्णांना उत्कृष्ट दर्जाची क्रिटिकल केयर आणि सेवा प्रदान करण्यासाठी पूर्णपणे सुसज्ज आहे.






## घरात वेश्या व्यवसाय ; दलाल अटकेत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई पोलिसांच्या 'अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष' ने उलवे मधील उन्नती हाऊसिंग सोसायटीतील एका घरावर छापा मारुन घरातून वेश्याव्यवसाय चालविणाऱ्या दलालाला अटक केली आहे. या कारवाईत 'एएचटीयू'च्या पथकाने वेश्याव्यवसायासाठी बोलावण्यात आलेल्या एका मुलीची सुटका देखील केली आहे.

उलवे, सेक्टर– १९ ए भागातील उन्नती हाऊसिंग सोसायटीत राहणारा एक दलाल आपल्या घरातून वेश्याव्यवसाय चालवत असल्याची महिती 'एएचटीयू'च्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पराग सोनवणे आणि त्यांच्या पथकाने सदर दलालाला बनावट ग्राहकाच्या माध्यमातून संपर्क साधला होता. त्यानंतर दलाल भूषण गणपत कोयंडे (३०) याने बनावट ग्राहकाला तो राहत उन्नती सोसायटीतील आपल्या घरी बोलावून घेऊन त्याला आपल्या मोबाईल वरील दोन मुलींचे फोटो दाखविले. बनावट ग्राहकाने त्यातील एका मुलीची निवड केल्यानंतर दलाल भूषण कोयंडे याने सदर मुलीला फोन करुन आपल्या घरी बोलावून घेतले. त्यानंतर त्याने बनावट ग्राहकाकडून ३ हजार रुपये घेऊन त्याला वेश्यागमनासाठी मुलीसह बेडरुम मध्ये पाठवून दिले. याचवेळी बनावट ग्राहकाने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला इशारा केल्यानंतर काही वेळातच एएचटीयुच्या पथकाने सदर घरावर छापा मारला. यावेळी दलाल भूषण कोयंडे आपल्या घरात वेश्याव्यवसाय चालवित असताना सापडल्यानंतर 'एएचटीयू' च्या पथकाने त्याच्या विरोधात एनआरआय पोलीस ठाण्यात अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली. यावेळी 'एएचटीयू'च्या पथकाने वेश्यागमनासाठी आलेल्या मुलींकडे केलेल्या चौकशीत भूषण कोयंडे ग्राहकांकडून वेश्यागमनाचे ३ हजार रुपये घेत असल्याचे आणि त्यातील २ हजार रुपये स्वतः घेऊन उर्वरीत १ हजार रुपये वेश्यागमनासाठी येणाऱ्या मुलींना देत असल्याचे आढळून आले. त्यानंतर 'एएचटीयू'च्या पथकाने वेश्यागमनासाठी कोयंडे याने बोलावलेल्या मुलीची सुटका केली. सदर घरामध्ये मागील काही महिन्यांपासून वेश्याव्यवसाय चालविण्यात येत असल्याचे तपासात आढळून आले आहे.

## शिवसेनेचा दसरा मेळावा ; उरणमध्ये जल्लोष



**दै.रायगड नगरी । उरण**

दसरा मेळावा कोणाचा ? या विषयावर शिंदे गट व ठाकरे गटात कलगीतूरा रंगला होता. अखेर या वादावर पडदा पडला असून गुरुवार दिनाकं २३ सप्टेंबर २०२२ रोजी उच्च न्यायालयाने शिवसेनेचा दसरा मेळावा शिवतीर्थावर घेण्याचा दिलेल्या निकालाने उरण मध्ये शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी पेढे वाटून व फटाके फोडून जल्लोष साजरा केला.शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर व माजी जिल्हाप्रमुख दिनेश पाटील यांनी आपल्या मनोगतातून उच्च न्यायालयाच्या निकालाने आनंद वक्त करून उरण विधानसभा मतदारसंघातुन पाच हजार शिवसैनिक दसरा मेळाव्यासाठी उपस्थित राहणार असा विश्वास वक्त केला.

या वेळी उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, गटनेते गणेश शिंदे, शहर संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे, शहर संघटक दिलीप राहाळकर, उपतालुका संघटक के एम घरत, माजी शहरप्रमुख महेंद्र पाटील, नगरसेवक अतुल ठाकूर, निलेश भोईर, उपशहरप्रमुख कैलास पाटील, गणेश पाटील, शिक्षक सेनेचे कौशिक ठाकूर, अवजड वाहतूक सेनेचे चेतन म्हात्रे, धीरज बुंदे, विभागप्रमुख गणेश शेलार, विकास कडू, गटप्रमुख व अंगीकृत संघटनेचे पदाधिकारी व शेकडो शिवसैनिक उपस्थित होते.